आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१२ डिसेंबर २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- कुपोषणामुळं होणारे बालमृत्यू टाळण्यासाठी प्रयत्नशील असल्याची राज्य सरकारची ग्वाही

- महानगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणूक एकत्र लढवण्याचा महायुतीचा निर्धार

- काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, देशाचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचं निधन / राष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांसह मान्यवरांची आदरांजली

**आणि**

- स्क्वॉश विश्वचषक २०२५ स्पर्धेत ब्राझीलवर दमदार विजय मिळवत भारताचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

<><><><><>

राज्यातल्या तीव्र कुपोषित बालकांची संख्या २०१९-२० मध्ये २४६ होती. ती २०२५-२६ मध्ये ९७ पर्यंत कमी झाल्याची माहिती महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी विधान परिषदेत चर्चेच्या उत्तरात दिली. एकाही बालकाचा कुपोषणामुळे मृत्यू होऊ नये यासाठी शासन प्रयत्नशील आहे. त्यासाठी महिला आणि बालविकास, आरोग्य, आदिवासी विकास या संबंधित विभागांचा गट तयार करण्यात येईल, असंही तटकरे म्हणाल्या. उमा खापरे यांनी कुपोषणामुळे बालकांच्या होणाऱ्या मृत्यूसंदर्भात चर्चा उपस्थित केली होती. या चर्चेत सदस्य सर्वश्री संजय खोपडे, प्रवीण दरेकर, चित्रा वाघ यांनी सहभाग घेतला.

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास देशभरातील विद्यार्थ्यांपर्यंत योग्य गौरवाने पोहोचावा, याबाबत राज्य सरकार कटिबद्ध आहे. यासाठी पाठपुरावा अधिक वेगाने केला जाणार असल्याचं राज्यमंत्री पंकज भोयर यांनी अर्धातास चर्चेला उत्तर देताना सांगितलं. सत्यजित तांबे यांनी सीबीएसई अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील इतिहासाचे लेखन अपुरे असल्याबद्दल चर्चा उपस्थित केली होती. यावेळी सदस्य अमोल मिटकरी, ज.मो.अभ्यंकर हे चर्चेत सहभागी झाले होते. अमोल मिटकरी यांनी अस्सल चरित्र साधन समिती अद्याप गठित न झाल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

<><><><><>

बृहन्मुंबई महानगर क्षेत्रातील तब्बल २० हजार इमारतींना भोगवटा देण्याचा निर्णय शासनानं घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी आजपासून सुरू झाली असल्याची माहिती मंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत दिली. राज्यात शिक्षकाच्या ३७ हजार रिक्त जागा भरण्याची मागणी काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. यावर शिक्षक भरतीबाबत नवीन पद्धत लागू करण्याची गरज असल्याचं मंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितलं.

भिवंडी शहरातल्या सर्वे क्रमांक १३० आणि सर्वे क्रमांक १३९ ही जागा नवीन डम्पिंग ग्राउंडसाठी निश्चित करण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी केल्यानुसार या ठिकाणी नवीन डम्पिंग ग्राउंड उभारण्याचा प्रस्ताव शासन मंजूर करेल, अशी माहितीही सामंत यांनी दिली. यासंदर्भात विधानसभा सदस्य रईस शेख यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती.

महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी उमेद मॉल सुरू करण्यात आले असून पहिल्या टप्प्यात दहा जिल्ह्यात हे मॉल उभारण्यात येणार असल्याचं ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितलं. नाना पटोले, बाबासाहेब देशमुख, सुधीर मुनगंटीवार आदी सदस्यांनी उपस्थित के ेलेल्या लक्षवेधीला ते विधानसभेत उत्तर देत होते. पुढल्या टप्प्यात उमेद मॉल तालुका पातळीवरही उभारले जाणार असल्याचं गोरे यांनी सांगितलं. उमेद अभियानात कार्यरत असलेल्या समुदाय संसाधन व्यक्तींना ‘ग्रामसखी’ हे पदनाम देण्यात येणार असून या संदर्भातील शासन निर्णय आजच जारी होणार असल्याचं त्यांनी सभागृहात जाहीर केलं.

पुणे महानगरपालिकेत लोहगावासह ११ नवीन गावांचा समावेश प्रस्तावित असलेल्या विकास आराखड्याची अंतिम प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. कायद्यानुसार सर्व टप्पे पूर्ण झाल्यानंतरच अंतिम विकास आराखडा जाहीर करण्यात येईल, अशी माहिती सामंत यांनी दिली. बापूसाहेब पठारे यांनी याबाबत विधानसभेत लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती.

याशिवाय झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत तयार करण्यात आलेलं नेत्रम ॲपमधे नोंदवलेला डेटा तपासण्यासाठी प्रशासनाला निर्देश देण्यात येतील त्याचप्रमाणे एमआयडीसीच्या जागेवर सुरू असलेला स्टोन क्रशर बंद केल्याच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती नेमली जाणार असल्याचं मंत्री उदय सामंत यांनी सभागृहात सांगितलं.

<><><><><>

वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वे प्रकल्पातील गौण खनिज ईटीएस मोजणी अहवाल दोन महिन्यात सादर करण्याचे निर्देश विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी आज दिले. या प्रकल्पात कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असून सरकारचा ६०० कोटींचा महसूल बुडाल्याची तक्रार अमोल कोमावर यांनी केली होती. या प्रकरणी विधानसभा उपाध्यक्षांच्या दालनात आज बैठक झाली, यावेळी तहसीलदार, मंडळ अधिकारी, भूमी अभिलेख, रेल विकास निगम यांनी एकत्रित समिती तयार करून ईटीएस मोजणी अहवाल सादर करावा असे निर्देश उपाध्यक्षांनी दिले.

<><><><><>

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या महायुती म्हणूनच लढणार असल्याचं भाजपाचे प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण आज नागपुरात पत्रकार परिषदेत म्हणाले. महत्त्वाच्या महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीत महायुतीतले सर्व पक्ष एकत्रितरित्या निवडणुकीत उतरतील. यासंदर्भात देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबत संयुक्त बैठक झाल्याची माहिती त्यांनी दिली. सर्व महानगरपालिका निवडणुकांमध्ये पक्षस्तरावर समित्या तयार करुन युतीचा फॉर्म्युला ठरविण्याच्या दृष्टीने बैठकीत चर्चा झाली. लोकहित आणि स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन महानगरपालिका निवडणुकांमधलं जागावाटप ठरवलं जाईल, असं चव्हाण यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील-चाकूरकर यांचं आज पहाटे लातूर इथं निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते. पाटील यांनी लोकसभेच्या सभापतीपदासह केंद्र सरकारमध्ये अनेक महत्त्वाची पदे भूषवली होती. लातूर मतदारसंघातून ते सात वेळा लोकसभेवर निवडून गेले होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी पाटील यांच्या निधनावर शोक व्यक्त केला. समाज माध्यमावरील संदेशात प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे की, पाटील हे एक अनुभवी नेते होते. ते समाजाच्या कल्याणासाठी योगदान देण्यास खूप उत्सुक होते. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही आपल्या समाज माध्यमावर शिवराज पाटील यांना आदरांजली वाहिली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवराज पाटील यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. पाटील हे महाराष्ट्राच्या राजकीय मूल्यांना जपणारे आणि त्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर उंचावणारे एक प्रतिष्ठित आणि सुसंस्कृत नेते होते असं त्यांनी म्हटलं आहे. थोड्याच वेळापूर्वी मुख्यमंत्र्यांनी त्यांचं अंत्यदर्शन घेतलं. राजकारण आणि समाजकारण यांची सुयोग्य सांगड घालणारा अनुभवी, सुसंस्कृत आणि सेवाभावी आदर्श काळाच्या पडद्याआड गेला आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्रद्धांजली वाहिली.

शिवराज पाटील यांच्या निधनाने देशाच्या राजकारणातील एक सभ्य, सुसंस्कृत आणि अभ्यासू व्यक्तिमत्व आपण गमावले आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी श्रद्धांजली वाहिली आहे.

शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने सार्वजनिक जीवनातील अनुभवी, अभ्यासू आणि सुसंस्कृत नेतृत्व हरपले असल्याचे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

पाटील यांच्यावर उद्या सकाळी ११ वाजता लातूर शहराजवळील वरवंटी इथं अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

<><><><><>

नाशिकमधल्या तपोवनातील एकही वृक्ष तोडू नये तसंच वृक्षतोडीविषयीचा अहवाल तात्काळ सादर करावा असे आदेश हरित लवादाने नाशिक महानगरपालिकेला दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयातले वकील श्रीराम पिंगळे यानी यासंबंधी याचिका हरित लवादाकडे दाखल केली होती, त्यावर लवादाने हा निर्णय दिला आहे.

<><><><><>

चेन्नईमध्ये सुरु असलेल्या स्क्वॉश विश्वचषक २०२५ स्पर्धेच्या गट ब सामन्यात, भारतानं ब्राझीलवर ४-० असा दमदार विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. वेलावन सेंथिलकुमारनं पेड्रो मोमेट्टोवर ३-० नं मात करत विजयामध्ये योगदान दिलं. भारतानं यापूर्वी आपल्या पहिल्या सामन्यात स्वित्झर्लंडला ४-० असं हरवलं होतं.

स्क्वाश विश्वचषक २०२५ या स्पर्धेत चार गटांमध्ये १२ संघ खेळत असून, प्रत्येक गटातले अव्वल दोन संघ उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश करतील. भारताचा पुढला सामना दक्षिण आफ्रिकेबरोबर होईल.

//<><><><><>//